# प्रकरण - ६

## समारोप

## प्रकरण सहावे

# समारोप

भाऊराव पाटील यांनी अल्पशिक्षित असूनही शिक्षणसंस्था स्थापन करून गरीब आणि शिक्षणव्यवस्थेपासून वंचित राहिलेल्या सर्व जातीधर्मातील मुलांसाठी रयत शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण मिळू न शकणाऱ्या अनेक होतकरू मुलांना जाणिवपूर्वक शिक्षणाच्या प्रवाहात आणले. संस्थेची उद्दिष्ट्ये निश्चित करून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली. विद्यार्थ्यांनी स्वावलंबी बनावे म्हणून 'कमवा आणि शिका' या योजनेद्वारे गरजू विद्यार्थ्यांना काम देवून त्यांना सन्मानही बहाल केला. संस्थेच्या धोरणानुसार भाऊरावांनी ग्रामीण आणि दुर्गम भागामध्ये शाळा महाविद्यालये सुरू करून शिक्षणाची गंगा संपूर्ण महाराष्ट्रभर पसरविली. कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर हा त्यातीलच एक प्रवाह आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्याविषयी भाऊरावांच्या मनामध्ये अपार अशी भक्ती होती. ज्या कोल्हापूर नगरीमध्ये आपण आल्पसे शिक्षण घेतले त्या शाहू महाराजांच्या नगरामध्ये रयत शिक्षण संस्थेचे एक महाविद्यालय असावे अशी त्यांची इच्छा होती. तथापि ही त्यांची इच्छा संस्थेतील त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या पश्चात पुर्ण केली. भाऊरावांचे अलौकिक कार्य माहित असलेल्या कोल्हापूरतील अनेकांनी हे महाविद्यालय स्थापन होण्यासाठी रयत शिक्षण संस्थेला सहकार्य केले. परिणामी शाहू महाविद्यालयाच्या स्थापनेवेळी कोल्हापूर शहरामध्ये पाच महाविद्यालये कार्यरत असूनही रयत शिक्षण संस्थेचे महाविद्यालय सुरू झाले. संस्थेची ध्येय धोरणे, प्राचार्यांचे योगदान, व्यासंगी आणि सामाजिक बांधिलकी मानणारा शिक्षक वर्ग, संस्थेसाठी

आवश्यक ते सर्व कष्ट उपसणारे शिक्षकेत्तर कर्मचारी आणि कोल्हापूरातील दानशूर व्यक्ती व संस्था या सर्वांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचा जम बसवून अल्पावधीतच महाविद्यालयाने कोल्हापूरच्या शैक्षणिक जगतामध्ये आपली स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली.

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक मा.व्ही.टी.पाटील यांनी आपण स्थापन केलेले किर्ती कॉलेज रयत शिक्षण संस्थेला दिले. महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म्हणून भाऊराव पाटील याचे मानसपूत्र आणि इंग्रजी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक डॉ.पी.जी.पाटील यांनी सूत्रे हाती घेतली.ताराराणी विद्यापीठाची जागा काही काळासाठीच वापरता येणार होती. त्यामुळे महाविद्यालयासाठी जागेचा शोध सुरू झाला. शहराच्या पूर्वेस कदमवाडीजवळ विचारे माळावरील तीन एकर जागा आमदार एन.डी.पाटील यांनी प्रयत्न करून तत्कालीन महसूलमंत्री बाळासाहेब देसाई यांच्याकडून मंजूर करून आणली. सदर जागा अत्यंत गलिच्छ स्वरूपात होती.संस्थेने परिसराची स्वच्छता करून छोटी इमारत बांधून महाविद्यालयाचे स्थलांतर केले. इमारतीसाठी संस्थेच्या सर्व सेवकांनी दोन दिवसांचे वेतन तर महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी एक महिन्याचे वेतन देणगीदाखल दिले.

बॅ.पी.जी.पाटील यांच्यानंतर १९६९ साली 'कमवा आणि शिका' या योजनेतून आपले शिक्षण पूर्ण केलेले आर.डी.गायकवाड हे प्राचार्य म्हणून रूजू झाले. छत्रपती शाहूंच्या नगरीत त्यांच्याच नावे आपल्या संस्थेचे एक महाविद्यालय असावे ही भाऊराव पाटील यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयाचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय' असे नामांतर करण्यात आले.

महाविद्यालयनने अल्पकाळातच संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढही नोंदविण्यास सुरूवात केली. व्यासंगी प्राध्यापकांच्या सततच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर शहरातील विद्यार्थी वर्ग महाविद्यालयाकडे आकर्षित होवू लागला. सुरूवातीला मराठी, हिंदी व अर्थशास्त्र या विषयामध्ये पदवी मिळविण्याची सुवधा होती. पुढील काळात समाजशास्त्र, भूगोल, इंग्रजी आणि इतिहास या विषयात पदवी मिळविण्याची सोय झाली.

१९६८ मध्ये सुरू झालेल्या वाणिज्य विभागात, लेखापत्र आणि लेखाविज्ञान या दोन विषयात पदवी मिळविण्याची सुविधा निर्माण करण्यात आली. १९७६-७७ या शैक्षणिक वर्षापासून कला व वाणिज्य शाखेतील ११ वी व १२ वी हे वर्ग सुरू झाले तर पुढे १९८५ साली विज्ञान विभागाच्या अकरावी वर्गाचा प्रारंभ झाला. महाविद्यालयात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र असून बी.ए., बी.कॉम व डिप्लोमा इन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. त्यासाठी शनिवार व रविवार हे दोन दिवस शिकविण्याचे कार्य चालते. व्यवसाय अभ्यासक्रम विभागांतर्गत तंत्र गटामध्ये बिल्डिंग मेन्टेनन्स, मेन्टेनन्स ॲण्ड रिपेअर्स ऑफ इलेक्ट्रीकल डोमॅस्टीकल अप्लायन्सेस हे दोन व वाणिज्य गटामध्ये अकौन्टिंग व ऑडिटिंग असे तीन अभ्यासक्रम सुरू झाले.

वरिष्ठ स्तरावर विज्ञान विभागाची सुरवात १९९४ साली झाली. १० वी परिक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या किंवा ८ वी किंवा ९ वी मध्ये शिक्षण थांबलेल्या विद्यार्थ्यां साठी 'जिवन विकास विद्यालय' या शिर्षकाखाली शाळा सुरू आहे. महिलांना सक्षम बनविण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ व निरंतन शिक्षण व विस्तारकार्य विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या बालवाडी शिक्षीका शिक्षण अभ्यासक्रमही

महाविद्यालयात राबवून संस्थेने महिला वर्गाबाबतीत आपले उत्तरदायित्व पार पाडले आहे.

पदवीप्राप्त विद्यार्थ्याला विविध खात्यामधील रोजगाराच्या संधीसाठी भरतीपूर्व प्रशिक्षणाची आवश्यकता लक्षात घेवून महाविद्यालयाने भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र ही संकल्पना राबविली आहे. बदलत्या काळाचे भान ठेवित २००५ पासून संगणक शिक्षणही सुरू केलेले आहे. गरीब व पात्र विद्यार्थ्याला रोजगाराची संधी मिळावी म्हणून ग्रामीण पत्रकारिता व जनसंपर्क माध्यमे हा अभ्यास सुरू करून महाविद्यालयाने पत्रकारीतेच्या क्षेत्रामध्येही आपला ठसा उमटविलेला आहे.

अभ्यासक्रमाचे योग्य ते नियोजन विद्यार्थी हजेरीबाबत दक्षता, महाविद्यालयापर्यंत सराव परिक्षा गुणवत्ता सुधार प्रकल्प, अचानक परिक्षा विद्यार्थी दत्तक पालक योजना अशा सातत्यपूर्ण विविध उपक्रमातून महाविद्यालयाने आपली गुणवत्ता वाढवून ती टिकवून ठेवण्याचेही कार्य यशस्वीपणे पार पाडले आहे.

विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास व्हावा आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचे विचार समजून घेता यावेत म्हणून महाविद्यालय अनेक तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करीत असते. आर्थिक दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना विविध फी सवलत योजनांचा व शिष्यवृत्त्यांचा आधार दिला जातो. महाविद्यालयातर्फे बुक बँक योजना या अत्यंत उपयुक्त योजनेची अंमलबजावणी होत असून त्यामधून १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात १२०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

महाविद्यालय फक्त विद्यापीठाचा क्रमिक अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी नसून एक आदर्श नागरिक घडविण्याची जबाबदारी पार पाडणारे असावे या विचारावर महाविद्यालयाची श्रद्धा आहे त्यासाठी...

शिवाजी विद्यापीठातर्फे राबविण्यात येणारी राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयात सुरू असून प्रौढ व निरंतन शिक्षण योजना, शाळा समूह योजना, खेडे दत्तक योजना, प्लॅनिंग फोरम, विद्यार्थी दत्तक योजना, विवेकवाहिनी व्यासपीठ, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, वक्तृत्त्व स्पर्धा, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् व गाइड्स विभाग, ग्रामविस्तार योजना या उपक्रमामधूनही विद्यार्थी-विद्यार्थीनींचे व्यक्तीमत्त्व घडविण्याचे कार्य सुरू आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना व शिस्त निर्माण व्हावी म्हणून राष्ट्रीय छात्रसेना हा उपक्रम सुरू असून त्यामधून अनेक विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकाविले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर लक्ष केंद्रित करणाऱ्या शाहू महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये ४० मासिके व तर ग्रंथसंख्या ६५,८९५ इतकी आढळते.

महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येमध्ये भरीव वाढ होवून १९६७-६८ मध्ये २४७ आसणारी संख्या २००५-०६ या शैक्षणिक वर्षात १४६२ पर्यंत पोहचली आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये प्राचार्य पदावर काम करणाऱ्या सर्वच व्यक्तींचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण असे आढळते. तथापि काही प्राचार्यांच्या कारकीर्दीमध्ये महाविद्यालयाने उल्लेखनीय असे टप्पे पार केले. त्यामध्ये बॅ.पी.जी.पाटील, आर.डी.गायकवाड, सुमतीबाई पाटील, अण्णासाहेब गरूड, व्ही.के.घाटे, एम.के.यादव, व्ही.एस.लिपारे व व्ही.एस.शिवणकर यांचा उल्लेख करावा लागतो.

रयत शिक्षण संस्थेने स्वावलंबी शिक्षण हे ब्रीदवाक्य स्विकारले आहे. परिणामी आवश्यक त्या महाविद्यालयामध्ये संस्थेने भाऊराव पाटील यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवून 'कमवा व शिका' ही योजना सुरू केली. कोल्हापूर शहर हे जिल्ह्याचे

ठिकाण असूनही प्राचार्य आर.डी.गायकवाड यांनी या योजनेला सुरूवात केली. अपेक्षेप्रमाणे ग्रामीण व दुर्गम भागातील होतकरू तरूण विद्यार्थ्यांनी त्याला प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयात प्रांगण स्वच्छ करणे, इमारतीत झाडलोट करणे, झाडांना पाणी घालणे, खडक फोडणे, भाजीची रोपे लावणे, घंटा देणे, रात्री पहारा देणे, ग्रंथालय व कार्यालयामध्ये प्रशासकीय कार्यात मदत करणे, खडूचा कारखना, उपहारगृह चालविणे अशी विविध कामे करून घेतली जातात. त्याबदल्यात संबंधीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, राहण्याची, जेवणाची आणि प्रसंगी कपड्यालत्याची जबाबदारी महाविद्यालय पार पाडते. शाहू महाविद्यालयात ही योजना अत्यंत उपयुक्त ठरली. महाविद्यालयातील कामे कमी पडू लागताच प्राध्यापक चंद्रकांत पाटगावकर व प्रा.ज.रा.दाभोळे यांनी रोटरी क्लब सदस्यांना आवाहन करून त्यांच्याकडील कामे मिळविली. अशाप्रकारे गरीब विद्यार्थांना काम देण्यामध्ये महाविद्यालय यशस्वी ठरले. या योजनेमधून २००५ पर्यंत दरवर्षी सरासरी ४५ विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. यामधील उपराकार लक्ष्मण माने, एम.के.बाड, एम.बी.शेख व दिलीप कांबळे इ.यशस्वी व किर्तीवंत विद्यार्थ्यांचा उल्लेख करता येईल.

रयत शिक्षण संस्थेच्या ध्येयधोरणानुसार 'कमवा व शिका' या योजनेत वसतिगृह अपरिहार्य असते. महाविद्यालयाने जवळच असणाऱ्या कदमवाडीमध्ये व नंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात वसतिगृहाची सुविधा प्राप्त करून दिली. त्यामध्ये सरासरी दरवर्षी ५५ ते ६० विद्यार्थ्यांना सहभाग असतो. त्यामधीलच दलित वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या सर्वसाधारणपणे ६० टक्के इतकी होती. बदलती सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती यामुळे सदर योजनेकडे विद्यार्थ्यांचा ओढा पुढील काळात कमी झाल्याचे दिसून येते. तथापि संशोधन कालखंडापर्यंत गरजू विद्यार्थ्यांना सदर योजनेचा

लाभ देण्याचे काम महाविद्यालयात सुरू आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्याची क्रिडा क्षेत्रातही प्रगती व्हावी हा विचार महाविद्यालयाने सतत जोपासला. परिणामी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये महाविद्यालयाने क्रिडाविभागात आपला स्वतंत्र असा ठसा निर्माण केलेला आहे. खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयाने पद्मश्री डॉ. कर्मवीर भाऊराव क्रिडासंकूल उभारलेले आहे. प्राचार्य व प्राध्यापक यांच्या सततच्या प्रयत्न व प्रोत्साहनामुळे विद्यार्थी खेळाडूंनी अनेक पारितोषिके पटकाविली आहेत. ४०० मीटर इतक्या लांबीचा रनिंग ट्रॅक असणारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील हे एकमेव महाविद्यालय आहे. कबड्डी, कुस्ती, जलतरण, सायकलींग, कराटे, कॅरम, वजन उचलणे, बुद्धीबळ, व तलवार बाजी इ. खेळांचे प्रशिक्षण तज्ञ व्यक्तीकडून दिले जाते.

पात्र व गरजू खेळाडूंना महाविद्यालयामार्फत मोफत प्रवेश देवून सर्व शुल्कामध्ये १०० टक्के सूट दिली जाते. बुक बँकेची सुविधा देण्यात येवून गरजू खेळाडूंना राहण्यासाठी वसतिगृहाची सुविधा मोफत पुरविली जाते. सातत्यपूर्ण प्रयत्न व प्रोत्साहन यामुळे महाविद्यालयाच्या विद्यार्थी विद्यार्थ्यींनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवपूर्ण कामगिरी केली आहे. त्यामध्ये रामचंद्र सारंग, नामदेव अप्पाजी पाटील, आप्पा कदम, सतीश मांडिया इ. गौरवपूर्ण उल्लेख होतो. क्रिडाक्षेत्रामध्ये महाविद्यालयाने मिळविलेल्या यशासाठी शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. आर. बी. पाटील, प्रा. ए. वाय. यादव, प्रा. संभाजी पाटील यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. ते सर्व क्रिडा शिक्षक संबंधीत खेळाडू समवेत सतत क्रिडांगणावर हजर राहून मार्गदर्शन करीत होते. त्यामुळेच खेळाडू व महाविद्यालय यांच्यामध्ये अत्यंत प्रेमाचे व जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले. परिणामी महाविद्यालयाने

क्रिडाक्षेत्रात शहरातील इतर महाविद्यालयाच्या तुलनेत मोठी दैदिप्यमान कामगिरी केली.

महाविद्यालयाच्या 'कमवा व शिका' या योजनेतून आपले शिक्षण पूर्ण करून उद्योग जगतात यशस्वी झालेल्या एम.के.लाड व एम.बी.शेख या माजी विद्यार्थ्यांनी 'माजी विद्यार्थी संघ' स्थापन करून महाविद्यालयाशी संपर्क ठेवलेला आहे. महाविद्यालयाने आपणास कठीण काळात केलेल्या मदतीची जाणिव ठेवून माजी विद्यार्थी संघाने महाविद्यालयास अनेक बाबतीत आर्थिक सहकार्य केलेले आहे. माजी विद्यार्थ्यांच्या मान्यवर यादीमध्ये

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.लक्ष्मण माने | २. | श्री.बाबासाहेब कुपेकर |
| ३. | श्री.अशोक किनिंगे | ४. | श्री.दिलीप कटके |
| ५. | श्री.बाबासाहेब पखाले | ६. | श्री.किसन कुऱ्हाडे |
| ७. | श्रीमती शैला साईनकर | ८. | श्री.भाऊराव पखाले |
| ९. | श्री.माधव सांगरूळकर | १०. | श्री.व्यंकाप्पा भोसले |
| ११. | डॉ.आनंद वास्कर | १२. | श्री.विजयनाथ महाजन |
| १३. | श्री.चंद्रकुमार नलगे | १४. | श्री.हुसेन जमादार |
| १५. | श्री.आर.बी.पाटील | १६. | श्री.एम.के.बाड |
| १७. | श्री.एम.बी.शेख | १८. | श्रीमती कांचन परूळेकर |
| १९. | श्री.दिलीप कांबळे | २०. | डॉ.हरिशचंद्र निर्मळे |
| २१. | रामचंद्र सारंग | २२. | कुमारी माया जाधव |
| २३. | श्री.शहाजी काळे | २४. | श्री.आप्पा कदम |
| २५. | श्रीमती पुष्पलता मंगल | २६. | सुनिल कदम |

२७. श्री.मयुर तावडे २८. विष्णू जोशिकर

२९. प्राचार्य डॉ.डी.एस.पाटील ३०. प्राचार्यडॉ.आय.एच्.पठाण

३१. प्रा.भारतभूषण माळी इ. सर्व विद्यार्थ्याची नावे यांचा समावेश होतो.

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या स्थापनेपासून २००५ पर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की महाविद्यालयाने संस्थापक कर्म वीर पद्मश्री डॉ.भाऊराव पाटील यांच्या विचार व आचारानुसार मार्गक्रमण केले आहे. गरीब वस्तीशेजारी महाविद्यालयाची उभारणी करून सामाजिक जाणिवेतून शेजारील झोपडपट्टीमध्ये विविध उपक्रम राबवित तेथिल रहिवाशांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य केले. 'कमवा व शिका योजना' वसतिगृह, बुक बँक, खेळाला सर्वतोपरी सहाय्य व प्रोत्साहन शैक्षणिक गुणवत्ता प्रशिक्षण केंद्र व विविध उपक्रमाद्वारे महाविद्यालयाने विद्यार्थी व्यक्तीमत्त्व विकास घडवून आणलेला आहे. यामध्ये दलित विद्यार्थी व विद्यार्थ्यीनींची संख्या लक्षणीय आहे. संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्विकारलेल्या ध्येय धोरणानुसार महाविद्यालयाची सर्वांगिण प्रगती झाली असून शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये महाविद्यालयाने आपले स्वतंत्र आणि गौरवपूर्ण असे स्थान निर्माण केलेले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या इच्छेनुसार त्यांचे श्रद्धास्थान असलेल्या छत्रपती शाहू महाराजांचे एक शैक्षणिक असे स्मारकच महाविद्यालयाच्या रूपाने कोल्हापूर नगरीमध्ये उभा राहीले आहे.